**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.१२/२०२६**

**आदेश नि.क्र. ५ वरील**

**सीएनआर.क्र.एमएचबीयू-१५०००३९१२०२६**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याविरुध्द कौटूंबिक हिंसाचाराचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ सह कलम २१ अन्वये दाखल करुन गैरअर्जदार क्र. १ यांच्याकडुन त्यांचा अज्ञान मुलगा गैरअर्जदार क्र. ४ याचा अंतरिम ताबा व गैरअर्जदार यांच्याविरुध्द संरक्षण आदेशबाबत मागणी केलेली आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन की, अर्जदार यांचे गैरअर्जदार क्र. १ यांच्यासोबत सन २०१९ मध्ये विवाह झाला असुन त्यांना गैरअर्जदार क्र. १ कडुन गैरअर्जदार क्र. ४ नामे आदर्श नावाचे अपत्य झाले होते. अर्जदार यांना गैरअर्जदार क्र. १ यांनी लग्नानंतर सुरूवातीचे ३ महिने चांगले नांदवले. परंतु, त्यानंतर त्यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी त्रास देण्यास चालु करुन शारिरीक व मानसिक छळ केला. असे असतांना गैरअर्जदार क्र. १ यांच्यात बदल होईल या कारणाने अर्जदार हिने त्यांचा त्रास सहन केला. परंतु, गैरअर्जदार क्र. १ याच्या स्वभावात बदल झाला नाही व त्याने अर्जदार यांच्याकडून ८०,०००/- रुपयाची मागणी केली व सदर रक्कम नाही दिल्यास फारकतीबाबतची धमकी दिली. अर्जदार हिची हलाखीची परिस्थीत असल्याने सदर रक्कम ती देऊ न शकल्याने गैरअर्जदार क्र. १ व त्याच्या कुटूंबीयांनी तिला तिच्या लेकरासहीत घराबाहेर हाकलुन दिले. त्यामुळे, अर्जदार ही तिच्या मुलासोबत तिच्या वडीलांच्या गावी रुम करून राहु लागली. त्यानंतर, गैरअर्जदार क्र. १ याने ०६.०५.२०२६ रोजी अर्जदार हिच्या घरी येऊन अर्जदार व तिचे घरचे, गैरअर्जदार व त्याचे घरचे व त्यांचे नातेवाईक अशी बैठक बसवली व त्यानंतर मुलाला फिरवुन आणतो असे म्हणुन त्याला घरातुन घेऊन गेला व त्यानंतर त्याने अर्जदार हिंस फोन करुन मुलगा पाहिजे असेलतर दोन दिवसांत फारकत दे नाहीतर मुलाला मारुन

टाकेल अशी धमकी देण्यास चालु केले. अर्जदार हिचा मुलगा हा अंगावरील दुध पिता असुन त्यास आईच्या प्रेमाची व काळजीची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच, सदर मुलास गैरअर्जदार क्र. १ याच्याकडुन जिवीताची धोका आहे. त्यामुळे मुलाचा तात्पुरता ताबा अर्जदार हिंस मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार क्र. १ याने भविष्यात सदर घटनेची पुनरावृत्ती करु नये याकरिता गैरअर्जदार क्र. १ पासून संरक्षण मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे, अर्जदार हिचा सदरील अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती करण्यात आली.

३. गैरअर्जदार क्र. १ याने सदरील अर्जावर नि.क्र. १४ अन्वये म्हणणे दाखल करुन अर्जातील त्यांच्याविरुध्दची सर्व आरोप फेटाळले असुन त्यांनी पुढे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार क्र. ४ याला बळजबरीने ताब्यात नेलेले नसुन तो मागील कित्येक वर्षापासुन गैरअर्जदार क्र. १ यांच्याकडेच आहे. अर्जदार हिने सदर अर्जामध्ये जाणिवपुर्वक गैरअर्जदार क्र. ४ याची जन्मतारिखेचा उल्लेख केलेला नसुन अर्जामध्ये त्याचे वय कमी दाखविलेले आहे. वास्तविक गैरअर्जदार क्र. ४ याचा जन्म ०८.०८.२०२० रोजी झालेला असुन त्याचे वय आजरोजी ६ वर्ष इतके असल्याने तो अंगावरचा दुध पिता आहे हे अर्जदार यांनी खोटे नमुद केलेले आहे. गैरअर्जदार क्र. ४ हा गैरअर्जदार क्र. १ चा देखिल मुलगा असल्याने अर्जदार इतकाच सदर मुलावर गैरअर्जदार क्र. ४ याचा अधिकार आहे. अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. ४ याचा वापर करुन गैरअर्जदार क्र. १ विरुध्द पोटगीबाबत व इतर बेकायदेशिर कार्यवाही करावयाच्या असल्याने अर्जदार हिस मुलाचा ताबा पाहिजे आहे. गैरअर्जदार क्र. १ याने गैरअर्जदार क्र. ४ यास राजुर येथे शाळेमध्ये दाखला दिलेला असुन तेथे त्याचे शाळा चालु झालेली आहे. उलटपक्षी अर्जदार ही ज्या खेड्या गावात राहती तेथे शिक्षणाची कोणत्याही प्रकारची सोय नसुन तसेच आरोग्याची सोय नसुन तेथे गैरअर्जदार क्र. ४ यास पाठविल्यास त्याच्या शैक्षणीक, शारीरिक व मानसिक वाढ होण्यास अढथळा निर्माण होईल. त्याचप्रमाणे, अर्जदार हिने तिची परिस्थीती हलाखीची असल्यामुळे गैरअर्जदार यांच्याकडुन तिच्या उदरभरणासाठी पोटगीची मागणी केली आहे. त्यामुळे, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. ४ याचे शैक्षणीक व

आरोग्याची सोय करण्यास पात्र नसल्याचे तिच्याच अर्जामुळे दिसुन येते. याउलट, गैरअर्जदार क्र. १ हा गैरअर्जदार क्र. ४ याचा उत्तम सांभाळ करु शकतो. त्यामुळे, गैरअर्जदार क्र. ४ याच्या भविष्यातील शैक्षणीक, मानसिक व शारिरीक विकास होण्याकरिता त्याचा ताबा गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे राहणे आवश्यक असल्याने अर्जदार हिचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद श्रवण केला.

५. अर्जदार यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला आहे की, गैरअर्जदार क्र. ४ हा दुध पीता मुलगा असुन त्यास अर्जदार यांच्या प्रेमाची व काळजीची खुप गरज आहे. उलटपक्षी गैरअर्जदार यांच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादाची भिस्त मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्या ***Sandeep Vrs. Archana Sandeep Pawar, 2025 NCBHC-Aug-32147, Criminal Application No. 3128 of 2025*** व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपुर ***Swapnil Bhagandas Kamble Vrs. Sau. Manisha, 2022 ALL MR(CRI)2296*** ठेवुन कथन केले आहे की, सदर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. ४ याचे पालनपोषण करण्याकरिता तसेच शैक्षणीक खर्च करण्याकरिता असमर्थ असुन त्याचप्रमाणे अर्जदार ही खुप छोट्या गावात राहत असल्याने गैरअर्जदार क्र. ४ यास आरोग्य सुविधा व उत्तम शिक्षण देण्याकरिता असमर्थ आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा राजुर सारख्या मोठ्या गावात राहत असुन तेथे मुलाच्या शिक्षणाची चांगली सोय असुन तेथे गैरअर्जदार क्र. ४ याला आरोग्य सुविधा देखिल चांगल्या प्रकारात मिळु शकते. त्यामुळे, मुलाच्या शैक्षणीक, शारीरिक, मानसिक प्रगतीकरिता मुलगा गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे राहणे अधिक सोयीचे आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार क्र. ४ याचे डायनामिक इंग्लीश स्कुल, राजुर येथे प्रवेश देऊन त्याची शुल्क देखिल भरलेले आहे. अशा परिस्थीतीमध्ये गैरअर्जदार क्र. ४ यास अर्जदार हिच्या ताब्यात दिले असता त्याचे शैक्षणीक देखिल नुकसान होईल. या सर्व बाबींचा विचार करता व त्यांनी दाखल केलेल्या उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यांचा विचार करता गैरअर्जदार क्र. ४ याच्या कल्याण्याकरिता त्यास गैरअर्जदार क्र. १

यांच्या ताब्यात ठेवणेच न्यायोचित होईल. त्यामुळे, अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करावा असा युक्तीवाद केला आहे. वरील परस्पर विरोधी युक्तीवादाच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन करण्याच्या आधी कलम २१ कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण २००५ याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. सदर कलमान्वये

*"इतर कोणत्याही कायद्यातील तरतुदी काही असल्यातरी कलम १२ मधील अर्जाच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर मुलाचा तात्पुरता ताबा अर्जदारास देण्याचा आणि प्रतिवादीस मुलांना भेट्ट देण्याचा आदेश न्यायदंडाधिकारी देऊ शकतात, मात्र जर न्यायदंडाधिकारी यांना असे वाटले की, प्रतिवादीने मुलांना भेटणे मुलाच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे तर न्यायदंडाधिकारी भेटीची परवानगी नाकारु शकतात".*

६. वर परस्पर विरोधी युक्तीवाद व कलम २१ च्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता सदर गैरअर्जदार क्र. ४ याचे वय ५ वर्ष ११ महिने इतके आहे. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार क्र. १ यांनी नि.क्र. २० च्या यादीसोबत अनुक्रमांक ४ वर दाखल केलेला प्रवेश शुल्क भरल्याबाबतची पावतीचे अवलोकन केले असता सदर गैरअर्जदार क्र. ४ यास गैरअर्जदार क्र. १ यांनी शाळेमध्ये प्रवेश दिल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. असे असलेतरी तात्पुरत्या ताब्याचा निर्णय ठरवतांना न्यायदंडाधिकारी यांनी मुलाचे सर्वोत्तम हित कशात आहे त्याचा विचार करावा. सर्वोत्तम हिताचे निकष विचारात घेतांना मुलाच्या मनोशारिरीक निरोगी वाढीसाठी व निगेसाठी जे घटक आवश्यक आहे त्याचा अधिक विचार करायला हवा. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्या ***Sandeep Vrs. Archana Sandeep Pawar, 2025 NCBHC-Aug-32147, Criminal Application No. 3128 of 2025*** यांनी न्यायनिवाड्यामध्ये प्रतिपालन केले आहे की, Welfare of child is of paramount importance in child custody matters, and its supersedes all other considerations, including the right of parents under the statues. Welfare includes physical, mental and emotional well-being along with education and conducive

surrounding. It was also held that, during deciding the interim custody Court interaction with minor considered crucial in determining custody.

७. त्याचप्रमाणे, मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपुर ***Swapnil Bhagandas Kamble Vrs. Sau. Manisha, 2022 ALL MR(CRI)2296*** मध्ये मा. उच्च न्यायालयाने कथन केले आहे की, Welfare of child is paramount considerations in matter of custody.

८. वरील दोन्हीं न्यायनिवाड्यात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या बाबीं गृहित धरुन त्याचप्रमाणे, कलम २१ कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण २००५ तयार करण्याच्या हेतू लक्षात घेऊन मी मुलाचे सर्वोत्तम हित पाहण्याकरिता त्याला माझ्या निजी कक्षामध्ये नेऊन संवाद साधला असता त्यात मुलाने त्यास त्याच्या आईकडे राहावयाचे असल्याचे स्पष्ट म्हटले. त्याचप्रमाणे तो आईसोबत जास्त आनंदी असल्याबाबतचे त्याच्या बोलण्यातुन जाणवले. त्यामुळे जरी गैरअर्जदार क्र. १ याने गैरअर्जदार क्र. ४ याचे शाळेमध्ये दाखला दिलेला असतातरी मुलाची मानसिक व शारिरीक विकास व त्याच्या सुखाची काळजी व त्याचा आनंद हा आईसोबत असल्याचे मला प्रथमदर्शनी निजीकक्षातील मुलासोबत साधलेल्या संवादातुन निष्पन्न झाले. त्यामुळे, सदर मुलाचे सर्वोत्तम हित सद्यस्थीतीमध्ये त्याच्या आईसोबत असल्याचे मला दिसुन येते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. ४ याचा तात्पुरता ताबा अर्जदार हिंस मिळणे न्यायोचित होईल.

९. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. १ विरुध्द संरक्षणाबाबत देखिल मागणी केलेली आहे. परंतु, अभिलेखावरील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र. ४ हा गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार यांच्या ताब्यातुन नेले किंवा कसे याबाबत स्पष्टता येत नाही व सदरील बाबी या पुरावांती शाबीत होणार आहे. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार क्र. १ याच्याकडुन गैरअर्जदार क्र. ४ याच्या जिवीतास धोका असल्याचे मला कुठेही प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे, संरक्षणाबाबतचा आदेश

खारिज करणे संयुक्तीक होईल. कारणे आदेश :-

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदार क्र १ याने गैरअर्जदार क्र. ४ याचा तात्पुरता ताबा अर्जदार हिस सदर आदेशापासुन पुढील २ आठवड्यामध्ये द्यावा असे गैरअर्जदार क्र. १ यास असे निर्देशित करण्यात येते. |
| ३. | संरक्षणाची मागणी नामंजुर करण्यात येते. |
| (आदेश खुल्या न्यायालयात घोषित) | |

स्वा/-
**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१,
देउळगाव राजा

दिनांक : १०/०७/२०२६.

प्र मा ण प त्र

“ मी याची पुष्टी करतो की, सदरील पीडीएफ फाईलमधील प्रत्येक शब्द नी शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे सारखेस आहेत.”

लघुलेखकाचे नाव :- श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,

न्यायालयाचे नाव :- प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १, देऊळगावराजा.

आदेश/न्यायनिर्णयाचा दिनांक :- १०/०७/२०२६

श्रुतलेखनाचा दिनांक :- १०/०७/२०२६

तपासलेले आणि स्वाक्षरी दिनांक :- १०/०७/२०२६

अपलोड केल्याचा दिनांक :- १०/०७/२०२६

स्वा/-

(श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,)

लघुलेखक.